FORM-1A

N.C.R.B. I.I.F.I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

0167742

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे ला. प्र. वि. Police Station, पहिली खबर क्र. ९५ FIR No., वर्ष २०२० Year, दिनांक ०६/१०/२० Date
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८, कलमे Sections ७ (अ)
   (ii) अधिनियम Act ........., कलमे Sections .........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections .........
3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार, तारीख पासून २८/०९/२० वेळ १३.००, तारीख पर्यंत ०६/१०/२० वेळ १३.१५ वा
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २९/०९/२०२० वेळ Time ११.३० वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०१, तारीख Date ०६/१०/२०२० वेळ Time ०५:४५
4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. .........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name तहसिलदार, ठिकाणाचे नंबर No. if any कार्यालय आवार, गल्ली Ward कुर्ला, रस्त्याचे नाव Name of road मुलुंड (प)
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........., गाव Village ........., पोस्ट Post ........., तालुका Taluka ........., जिल्हा Dist. ........., राज्य State .........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station मुलुंड, तालुका Taluka कुर्ला, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name शहाबुद्दीन शेख (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name आयुब शेख
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ०५/०८/१९९६, २४ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ८९८९२९९३१६५
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. H1376963, दिल्याचा दिनांक Date of Issue 05/11/2008 दिल्याचे ठिकाण Place of Issue मुंबई (f) व्यवसाय Occupation वकील
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste शेख, जनजात Sub-Caste .........
   (h) पत्ता Address: ........., गल्ली / सर्व्हे नं. Ward ........, घर / नाव नं. House/Name No. ........, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........, पॅन नं. PAN No. ........, वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road ........., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........., गाव Village ........., पोस्ट Post .........
   तालुका Taluka ........., जिल्हा Dist. ........., राज्य State ........., सध्याचा पत्ता Present Address अकीला बोर्ड चाळ, 1/1, पी.डी. कुर्ला कमानी, काजुपाडा पाईप लाईन, कुर्ला (प) मुंबई ७२
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. सोबतच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

श्री. सुहास अशोक रोकडे, वय ३५ वर्षे, धंदा - खाजगी एजंट, मुलुंड तहसीलदार कार्यालय, रा. - रामनगर, चाळ नं. ०१, लबाली बुद्ध विहारजवळ, रोड नं. २८, वागळे ईस्टेट, ठाणे (प), मो. नं. ९२२१४९८४४० ② ॲड. संदीप रमेश सोनावणे, वय ४०वर्षे, धंदा - वकील, रा. - नवजीवन सोसायटी, A विंग, खर्डी

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

फिर्यादी शहाबुद्दीन आयुब शेख यांची फिर्याद सोबतच्या स्वतंत्र कागदावर नोंद करण्यात आली असून तीच प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष,

(सही)

(सुनील लांघी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

Shahabuddin.

Scanned with CamScanner

दिनांक— ०६/१०/२०२०

—फिर्याद—

शहाबुद्दीन शेख आयुब शेख, वय—२४ वर्षे, धंदा—शिक्षण, रिझवी लॉ कॉलेज, बांद्रा मुंबई. रा.ठि. झकीनाबाई चाळ, १/१ काजुपाडा पाईपलाईन, कमानी कुर्ला पश्चिम मुंबई . मो.क्र. ९८९२९९३१६५.

मी वरील प्रमाणे असून नमुद पत्यावर कुटूंबीयांसह माझे जन्मापासून रहावयास आहे. माझे सोबत माझी आई नामे झुबेदा शेख, वडिल आयुब शेख व भाउ नामे हिबजु रहिमान असे रहावयास आहेत.

मी रिझवी लॉ कॉलेज, बांद्रा मुंबई येथे सन २०२०—२१ या शैक्षणिक वर्षाकरीता वकीलीचे अंतिम वर्षाचे शिक्षण घेत आहे. मी ॲड. वाहब खान, चित्रकला सोसायटी, ऑफीस नं. ०१, एल.बी.एस.रोड, कुर्ला मुंबई यांचेकडे वकीली व्यवसायाचे प्रशिक्षण घेत आहे.

आमचे आशिल श्री ब्रिजेस शेट्टी यांचे चुलत भावाचे सॉल्व्हंन्सी सर्टिफिकेट काढावयाचे असल्याने ब्रिजेस शेट्टी हे ॲड. वाहब खान यांचेकडे आले होते. ॲड. वाहब खान यांनी सॉल्व्हंन्सी सर्टिफिकेट काढणेकरीता मला तहसिलदार कार्यालय, कुर्ला, मुलुंड (प. ) मुंबई येथे पाठविले. म्हणून मी दिनांक २५/०८/२०२० रोजी सदरचे कामाकरीता तहसिलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड (प.) मुंबई येथे आलो. सदर कार्यालयात खिडकी क्रमांक ०१ वर कागदपत्रे जमा केली. त्यावेळी मला सांगण्यात आले की सॉल्व्हंन्सी सर्टिफिकेट १५ दिवसानंतर मिळेल. त्यानंतर मी ३ दिवसानंतर तहसिलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड (प.) मुंबई येथे खिडकी क्रमांक ०१ या ठिकाणी चौकशी केली असता कागदपत्र बरोबर असल्याचे सांगितले. व एका आठवडयानंतर सॉल्व्हंन्सी सर्टिफिकेट मिळेल असे सांगितले. त्यानंतर मी दोन वेळा वरील कार्यालयात आलो व सॉल्व्हंन्सी सर्टीफिकेटबाबत चौकशी केली असता तेथे मला सांगण्यात आले की, मंडळ अधिकारी यांचेकडून अहवाल आलेला नाही.

त्यानतर दिनांक २८/०९/२०२० रोजी मी तहसिलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड (प.) मुंबई येथे आलो. व नायब तहसिलदार श्री बाचकर यांना भेटलो.त्यांनी सांगितले की, ''तुमची कागदपत्र अपूर्ण आहेत'' त्यानंतर सदर कार्यालयातील कर्मचारी तुषार यांचेकडे मी माझे वरील प्रकरणाबाबत चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, ' सदर कामाकरीता रूपये ५०००/— एवढा खर्च येईल. ते पैसे बाचकर साहेब यांना दिल्यानंतर ते सर्टिफिकेट देतील.

मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २८/०९/२०२० रोजी सुमारे १९. ३० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे मोबाईल फोनवरून संपर्क साधला. त्यानंतर मी दिनांक २९/०९/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे गेलो. तेथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. त्यांनी मला पोलीस निरीक्षक लांघी व सहाय्यक

Scanned with CamScanner

पोलीस आयुक्त आबासाहेब पाटील यांची भेट घालून दिली व मला लेखी तक्रार अर्ज देण्यास सांगितले असता, मी तहसिलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड पश्चिम मुंबई येथील लोकसेवक बाचकर यांचेविरूध्द स्व:हस्ताक्षरात इंग्रजीमध्ये लेखी तक्रार अर्ज दिला.

त्यानंतर सदर दिवशी पो.नि.लांघी व स.पो.आ. पाटील यांनी मला दिलेल्या सुचनेनुसार लोकसेवक यांचे कार्यालयात जावून सॉल्व्हंन्सी सर्टिफिकेट च्या कामाबाबत चर्चा करून लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेण्याबाबत सांगितले. त्यावेळी मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येणार असल्याचे सांगितले आणि त्यामध्ये माझे व लोकसेवक यांच्यात होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रित करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी माझेकडे लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्यास त्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले होते.

त्यानुसार दिनांक २९/०९/२०२० रोजी पो.नि.लांघी, सपोआ पाटील, पंच व मी असे लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभागाचे गोपनीय कक्षात गेलो. त्याठिकाणी पो.नि.लांघी यांनी प्रथम डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पंचासमक्ष फॉरमॅट करून तो चालू करुन त्यामध्ये कोणतेही पूर्व संभाषण नसल्याची खात्री करुन घेवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये प्रथम माझे पोनि सुनिल लांघी व पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यांनतर पो.नि.लांघी व सपोआ पाटील व पथक असे लाप्रवि. कार्यालयातून पोलीस वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालयात पडताळणीकरीता रवाना झालो. मा. तहसिलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड पश्चिम मुंबई या कार्यालयाचे थोडया अंतरावर पोलीस वाहन थांबविले. पोनि लांघी व सपोआ पाटील यांनी मला व पंचाना पडताळणी कारवाईवेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे शर्टाचे आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावून तो चालू करुन लोकसेवकाची भेट घेण्याकरीता पंच श्री. प्रविण धनजय पाटील यांचेसोबत मला पाठविण्यात आले. सदरवेळी मी लोकसेवक यांचे तहसिलदार कार्यालय,कुर्ला, मुलुंड (प.) येथील कार्यालयात गेलो असता, रेकॉर्ड रूम येथे बसणारे क्लार्क तुषार यांचेशी माझी भेट झाली. त्यावेळेस मी त्यांना सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट बाबत विचारले असता मला तुषार म्हणाला की, ''नही ओ सर करेंगे तब ना, मुझे क्या करेंगे, वो बोलेना, मेरे पास ला, तो मै वो फाईल कल रखा था ना वैसा रख दुंगा उधर; आप सर का देखो, शेअर सर्टिफिकेट का क्या बोलते है । असे बोलून जब शामको सब चले जाते है ना, उसके बाद मिलो उनको, जब कोई नही रहेगाना उनके पास तब मिलो, असे मला सांगितले.

त्यानंतर लोकसेवक बाचकर हे मिटींगमध्ये व्यस्त असल्याने मी त्यांचे कार्यालयात थांबून राहिलो. व त्यानंतर लोकसेवक बाचकर व उपस्थित असलेला सुहास यांना भेटलो असता, त्यांनी सदर कामाकरीता शेअर्स सर्टिफिकेट आवश्यक असल्याचे सांगितले. त्यानंतर मी बाचकर यांचेशी त्यांचे कक्षात बोलत असतांना त्यांनी मला बाहेर उभ्या असलेल्या इसमास आत बोलाविण्यास सांगितले. त्यावेळी सुहास याने आतमध्ये जावून बाचकर साहेब

(सुनील लांघी)
पोलीस निरीक्षक,
[illegible] विभाग मुंबई.

Shahabuddin.

Scanned with CamScanner

<u>दिनांक ०६/१०/२०२० रोजीची शहाबुद्दीन शेख, यांची फिर्याद पुढे चालु</u>

यांचेसोबत चर्चा केली व मला बाहेर येवून म्हणाला की, ''साहब बोले, क्या बोलने का है तुम बोलो पहिला अमाउंट, मै साहबको बता देगा अमाउंट जो भी है ।'' 'दोनोका पांच, साहब सुनेंगे क्या नही, मालूम नही । असे बोलून दोन्ही हाताच्या पंजानी दहा बोटे दाखवून दहा हजार रूपये दयावे लागतील असा इशारा केला. व त्यानंतर बाचकर साहेबांना विचारून येतो असे सांगून, त्यांचे कक्षात जावून थोडया वेळाने बाहेर आला व मला म्हणाला की, 'ठिक है दे दो । त्याननतंर मी त्यास १५ ते २० मिनीटांनी पैसे घेवून येतो असे बोलून निघून आलो. त्यानंतर पथकातील अधिकाऱ्यांनी चर्चा करून ही कार्यवाही उदया करणे उचीत राहिल असे त्यांनी मला सांगितले.

त्यानंतर दिनांक ३०/०९/२०२० रोजी पुन्हा दुपारी तहसिलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड पश्चिम मुंबई येथे पडताळणी पथकासह आलो. सदरवेळी गोपनीयतेच्या कारणास्तव शासकीय वाहनात माझे पोनि लांघी, व पंचाचे वक्तव्य घेण्यात आले. बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात आला. त्यानंतर मी व पंच प्रविण पाटील असे तहसिलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड (प.) मुंबई येथे गेलो. सदर ठिकाणी लोकसेवक बाचकर यांचेसोबत कामाबाबत चर्चा झाली. व कार्यालयाचे बाहेर उभा असलेला सुहास हा मला भेटला त्यावेळी मी त्यास रूपये दहा हजार ही रक्कम जास्त असल्याने साहेबांना भेटून थोडी कमी करण्याबाबत मी त्यास विनंती केली असता तो मला असे म्हणाला की, 'अरे लेकीन थोडा मतलब कितना कम करो, अरे तु बोल तो सही, अमाउंट बोलना, सामने बताएगा ना साहब को, तुम कल बात डन किया दस हजार ना, तुमही डन किया था ना, मेर को तो ओ हजार रूपये मिलने वाला है, अभी तुमही बोलो अमाउंट असे बोलून अभी पैसा लाया क्या, इधर तुम, किधर है- पैसा असे बोलला त्यावर मी त्यास मै लेक आता हू, असे बोलून निघून गेलो. त्या दिवशी संध्याकाळी उशीर झालेने तसेच कार्यालय बंद झाल्याने पथकातील अधिकाऱ्यांनी सदरची कार्यवाही पुढील कार्यालयीन वेळेत करू असे मला सांगितले.

पडताळणी दरम्यान सुहास यांनी लोकसेवकावर प्रभाव पाडून शासकीय काम करण्याकरीता लाचेची मागणी झाल्याची खात्री झाल्याने दिनांक ०६/१०/२०२० रोजी पोलीस पथकासह सापळा कारवाईकरीता तहसिलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड (प.) मुंबई येथे आलो. तहसिलदार कुर्ला, मुलुंड मुंबई या कार्यालयापासून थोडया अंतरावर शासकीय वाहनें थांबविली. सहायक पोलीस आयुक्त आबासाहेब पाटील व पोलीस निरीक्षक लांघी यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला, पंचाना तसेच सापळा पथकास सुचना दिल्या. त्यावेळी मी माझेकडील रु. १०,०००/— (रु.५०० च्या २० चलनी नोटा) पो.नि. लांघी यांचेकडे दिल्या. पोनि.लांघी यांनी पोलीस वाहनावरील पोलीस चालक किशोर भोसले यांचेमार्फत रु.१०,०००/—रकमेस पंचासमक्ष ॲथ्रासिन पावडर कापसाच्या बोळयाने लावली. सदरहु नोटा पोलीस चालक भोसले यांनी पंचासमक्ष त्यांचे हाताने माझे पॅटचे पुढील उजव्या

Scanned with CamScanner

खिशात ठेवल्या. गोपनीयतेच्या दृष्टीकोनातून शासकीय वाहनातच माझे तसेच पंच व पोनि लांघी यांचे वक्तव्य डीजीटल व्हाईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर माझे शर्टाचे आतील बनियनला डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून लावून पंचासोबत पाठविण्यात आले. मी व पंच पाटील असे तहसिलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड (प.) मुंबई यांचे कार्यालयाचे पाठीमागील बाजुस असलेल्या मोकळया परिसरात असलेल्या ॲड. दिलीप वाघ यांचे पत्र्याचे शेडमध्ये असलेल्या ऑफीससमोर सुहास यास जावून भेटलो व त्यास सॉल्व्हंन्सी सर्टिफिकेट बाबत विचारले असता, त्याने पैशाबाबत विचारपुस करून, 'देना फिर पैसा, लाया है तो, दे देना, कितना है तु गिनके देना, असे बोलला व सोबत असलेल्या वकीलास पैसे घ्या ओ याचे असे बोलला, म्हणून मी उजव्या हाताने लाचेची रक्कम काढून संदिप सोनवणे यांचेकडे रूपये १०,०००/— दिले. संदिप सोनावणे यांनी सदरची रक्कम आपले डाव्या हाताने पॅटचे पुढील डाव्या खिशात ठेवली. त्यावेळी सुहास मला बोलला की, 'आप तुषार के पास जाओ; मै तुषार को फोन लगाता है । दरम्यान लाचेची रक्कम स्विकारलेनंतर मला दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे डोक्यावरून डावा हात फिरवून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा दिला. त्यावेळी तात्काळ सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी खाजगी इसम सुहास रोकडे व ॲडव्होकेट संदिप सोनवणे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ ताब्यात घेतले. त्यानंतर मी लोकसेवक तुषार यास भेटण्यासाठी तहसिलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड (प.)मुंबई येथील पहिल्या माळयावर गेलो व त्यांचेकडून सॉल्व्हंन्सी सर्टिफिकेट घेतले.

आरोपी खाजगी इसम १) सुहास रोकडे व २) ॲड. संदिप सोनवणे यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत. तसेच नमुद आरोपीतास देण्यासाठी आणलेली लाचेची रक्कम ही माझे वैयक्तीक बचतीतून आणलेली आहे.

तरी आज दिनांक ०६/१०/२०२० रोजी केलेल्या सापळा कारवाईत लोकसेवकावर प्रभाव टाकून सॉल्व्हंन्सी सर्टिफिकेट देण्याकरीता खाजगी इसम सुहास रोकडे व ॲड. संदिप सोनवणे यांना माझेकडून रू. १०,०००/— एवढी लाचेची मागणी करून लाच स्विकारलेनंतर त्यांना रंगेहाथ पकडले म्हणून माझी खाजगी इसम सुहास रोकडे व ॲड. संदिप सोनवणे यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद असून कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला हिंदीत समजावून सांगितली, ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(सुनील लांघी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Shahabuddin

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........................................

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडाया) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडाया) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फिर्यादी हे दि. २८/०९/२० रोजी तहसीलदार कार्यालय कुर्ला, मुलुंड (प) मुंबई येथे अशिलाच्या वतीने सॉल्वन्सी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी गेले असता, सदर कार्यालयातील सेवकाने सदरचे काम करण्यासाठी रु. ५०,०००/- लाचेची मागणी केली अशी दि. २९/०९ तक्रार दिली. दि. २९/०९/२० व ३०/०९/२० रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान यातील आरोपी क्र. याने लोकसेवकावर प्रभाव टाकून काम करून घेण्याकरीता रु. २०,०००/- मागणी केल्याचे झाले. दि. ०६/१०/२० रोजी केलेल्या सापळा कारवाईमध्ये आरोपी क्र. ०१ यांचे सांगण्यावरून क्र. ०२ याने रुपये २०,०००/- लाचेची रक्कम फिर्यादीकडून स्विकारली म्हणून गुन्हा व

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ७(अ) भ्र. प्र. अधि. १९८८ अन्वये गुन्हा.

सुनील लांघी, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........................., जिल्हा .........................., राज्य ..........................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................

District................................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

Shahabuddin

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb Impression

of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name सुनील लांघी

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ..........................

Posting

Code No. of I. O. ..........................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner